**<u>रे. मु. क्र. १११ /२००९</u>**

अरुण दादु रोकडे <u>विरुध्द</u> सिताराम गवते

**<u>निशाणी क्र. १२५ वरील आदेश</u>.**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा हा जाहिर ठराव होऊन जमीनीचे मालक व वतनदार आहेत असे ठरऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र.११ ते १३ यांच्या नावाची नोंद बेकायदेशिर व पोकळीस्त असल्याने वादी यांचे हक्क व अधिकारावर बंधनकारक नाही असे ठरऊन मिळणेसाठी केलेला आहे. सदर दावा वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. सदर दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी दावा मिळकत गट क्र.१६ चे ०.३८आर क्षेत्र अधिक पोट खराबा ०.०७आर पैकी दक्षिण बाजुचे ०.०५आर क्षेत्र प्रतिवादी लक्ष्मण नाथा राहिंज यांना दि.०६.०९.२०१८ रोजी खरेदीखत क्र.४०५८/२०१८ रक्कम रु.१,२५,०००/– ला विकले. म्हणुन लक्ष्मण यास सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१७ म्हणुन सामील करण्यात यावे. तसेच वादी यांनी अर्जाप्रमाणे परिच्छेद क्र.२, ३ व ४ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर करुन अर्जातील कथने नाकारली आहेत व पुढे असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज मुदतीत नाही. सदरचा दावा सन २००९ मध्ये दाखल आहे व सदर दुरुस्ती सन २०१८ च्या खरेदीखताबाबत आहे. सदर खरेदीखताची माहिती वादीस सन २०१८ सालीच झाली होती. परंतु सदर खरेदीखताची माहिती वादीस केव्हा झाली याचा उल्लेख जाणिवपुर्वक अर्जात नमुद केला नाही. सबब, प्रतिवादीने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळला. प्रस्तुत दावा हा जाहिर ठराव होऊन जमीनीचे मालक व वतनदार आहेत असे ठरऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच अभिलेखावरुन दिसून येते की, सदर दाव्यातील मिळकतीचा

काही भाग दावा चालु असताना प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी ति–हाईत व्यक्तीस हस्तांतरीत केला आहे. त्यामुळे त्यासंदर्भात दुरुस्ती करणे वादीस अनिवार्य आहे. तसेच सदर उपरोक्त वादीच्या कथनाप्रमाणे दुरुस्ती ही कायदेशिर असून त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. सदर अर्जास प्रतिवादीने विशेष हरकत घेतलेली नाही. प्रतिवादीच्या मते वादीचा अर्ज हा मुदतीत नाही व सदर अर्जास उशिर झालेला आहे. परंतु दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी सर्व बाबी वादीने दाव्यात सामील करणे आवश्यक असते. जर दाव्याचे स्वरुप बदलत नसेल तर तशी दुरुस्ती करणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादींचा प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र असल्याचे दिसून येते. सबब, मी खालीप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्र.१२५ हा रुपये १५००/– खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादीने दाव्यात करुन मागितलेली दुरुस्ती ही या आदेशापासुन १४ दिवसाच्या आत करावयाची आहे व तशी दुरुस्त प्रत दाखल करावयाची आहे.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादीस देण्यात यावी.

MUBIN CHANDPASHA SHAIKH

Digitally signed by MUBIN CHANDPASHA SHAIKH
Date: 2026.04.06 17:33:54 +05'30'

दिनांक – ०६.०४.२०२६ (एम. सी. शेख )
पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
पारनेर.